ePaper **ज्यांना स्वत:ला निवडून येता येत नाही ते पाडण्याची भाषा करतात: श्रीरंग बारणे**

| वर्ष - 7 | अंक - 197 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 25 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



### आतील पानांत


- टी-20 वर्ल्ड कपसाठी संजूची निवड?
- मार्शच्या कृत्यावर उर्वशी संतापली
- काँग्रेस नेते 'बीआरएस'मध्ये येतील!
- यात्रा सुरू असतानाच स्वच्छता मोहीम


## तीन विधानसभा मतदारसंघात ताकद तरीही;

# उमेदवारीची शक्यता धुसर?

### मावळ लोकसभा मतदार संघातील स्थिती : जागावाटपावरुन खडजंगी होणार?

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महायुतीमध्ये सहभागी झाल्यानंतर लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीत जागा वाटपांचा तिढा सूटणार कसा? असा प्रश्न उपस्थित होत आहे. विशेषत: मावळ लोकसभेत अधिक तिढा निर्माण होण्याची शक्यता आहे. सहा मतदारसंघापैकी तीन विधानसभा मतदारसंघात उमपुख्यमंत्री अजित पवार यांची मोठी ताकद आहे. मात्र, विद्यमान खासदार असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे समर्थक खासदार श्रीरंग बारणे यांना हा मतदारसंघ सोडण्याची वेळ उपमुख्यमंत्री पवार यांच्या राष्ट्रवादीवर येणार आहे. पवार समर्थक हा मतदारसंघ मोकळ्या मनाने सोडणार की जागा वाटपावरून खडाजंगी होणार? हे पहावे लागणार आहे.**







ग्राऊंड रिपोर्ट

मावळ लोकसभा मतदारसंघाची जागा राष्ट्रवादीसाठी सोडली जाते. विरोधात शिवसेनेचा उमेदवार असतो. दोन्ही पक्षात सध्या दुफळी पडल्याने राजकीय गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. महायुतीमध्ये जागा वाटपामध्ये तिढा निर्माण होणार हे नक्की आहे. मावळ लोकसभेचे उदाहरण घेतल्यास या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसची विशेषत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ताकद जास्त आहे. मावळ लोकसभांतर्गत पिंपरी, चिंचवड, मावळ तसेच रायगडमधील पनवेल, कर्जत, उरण हे तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. पिंपरी, मावळ विधानसभेच्या आमदारांनी अजित पवारांना समर्थन दिले आहे. तर रायगड जिल्हा हा तटकरेंचा बालेकिल्ला आहे. तटकरेही उपमुख्यमंत्री अजित पवारांसोबत आहेत.

#### महाविकास आघाडीची सावध भूमिका...

» महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे यांची शिवसेना, खासदार शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि काँग्रेस या पक्षांच्या नेत्यांकडून सावध भूमिका घेतली असल्याचे चित्र आहे. मावळ लोकसभेत ठाकरे यांच्या शिवसेनेची मोठी ताकद आहे. त्यांच्याकडून सातत्याने लोकसभेतील पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली जात आहे. आढावा घेतला जात आहे. मात्र उमेदवार कोण असणार या बाबत त्यांनी कमालीची गुप्तता पाळल्याचे चित्र आहे. तर उर्वरीत मित्र पक्षाने देखील या मतदारसंघावर आपला न दाखवून पक्षीय आघाडी सांभाळली आहे.

या लोकसभा मतदारसंघात शिवसेनेला मानणारा मोठा वर्ग आहे. मात्र पक्ष विखुरला गेल्याने त्याचा खासदार बारणे यांना फटका बसेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मानणारा वर्ग या भागात कमी आहे. मात्र विद्यमान खासदार हे सूत्र लावून ही जागा मुख्यमंत्री शिंदे आपल्या पारड्यात पाडून घेणार हे नक्की आहे. उमेदवारीचे शिवधनुष्य खा. बारणे यांच्याकडे सोपविले जाईल, अशी चर्चा आहे. खासदार बारणे यांना सध्या आव्हानांचा डोंगर आहे. या ऊलट उपमुख्यमंत्री पवार यांच्या गटाला तीनही पक्षाची ताकद मिळाल्यास निवडणूक सोपी जाण्याची शक्यता आहे. तरीही ही जागा पवारांच्या वाट्याला न येणे हे शल्य त्यांचे समर्थक पेलवणारा का, हे पहावे लागणार आहे.

---

# आचल आगरवाल, श्रुती पवार ठरल्या सामना विरांगना

### व्हेरॉक वेंगसरकर स्पर्धेत व्हेरॉक वेंगसरकर आणि ऑल स्टार्स विजयी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**19 वर्षाखालील मुलींच्या व्हेरॉक वेंगसरकर चषकातील चौथ्या दिवशीच्या साखळी सामन्यांमध्ये व्हेरॉक वेंगसरकर अॅकॅडमी आणि ऑल स्टार्स क्रिकेट अॅकॅडमी या संघांनी विजय मिळवला आहे. या सामन्यात व्हेरॉक वेंगसरकर अॅकॅडमीची खेळाडू आचल आगरवाल आणि ऑल स्टार्स क्रिकेट अॅकॅडमीची खेळाडू श्रुती पवार या सामना वीरांगना ठरल्या. थेरगाव येथील महापालिकेच्या राजीव गांधी क्रीडा संकुलात या स्पर्धा पार पडल्या.**





व्हेरॉक वेंगसरकर अॅकॅडमी विरुद्ध आर्यन्स क्रिकेट अॅकॅडमी या सामन्यात व्हेरॉक वेंगसरकर अकादमीच्या संघाने आर्यन्स क्रिकेट अकॅडमीच्या संघावर 10 विकेट्स राखून सहज विजय मिळवला. आर्यन्स क्रिकेट अॅकॅडमीच्या संघाने दिलेले 92 धावांचे लक्ष्य व्हेरॉक वेंगसरकरच्या संघाने 20 व्या षटकात सहज पार केले. या सामन्यात दोन विकेट आणि 39 धावांची अष्टपैलू कामगिरी करणारी अचल अगरवाल सामना वीरांगना ठरली.

#### निहिरा शर्माची नाबाद 27 धावांची खेळी

» ऑल स्टार्स क्रिकेट अकॅडमीने बी अ स्पोर्ट्स अकॅडमीच्या संघावर 9 विकेट्स राखून विजय मिळविला. प्रथम फलंदाजी करताना बी अ स्पोर्ट्स अॅकॅडमीचा संघ अवघ्या 54 धावांमध्ये गारद झाला. प्रत्युत्तरात ऑल स्टार्स क्रिकेट अकॅडमीने 1 विकेट गमावून 55 धावांचे लक्ष्य 8 षटकांत सहज गाठले. या सामन्यात 2 बळी घेणारी श्रुती पवार सामना वीरांगना ठरली. निहिरा शर्मा हिने नाबाद 27 धावांची खेळी केली.

# शाळेची माहिती अद्ययावत न केल्यास
# शिक्षकांचे वेतन रोखण्याची कारवाई!

## » यू-डायस प्लस प्रणालीमध्ये माहिती अद्ययावत करावी

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**यू-डायस प्लस ऑनलाइन प्रणालीमध्ये शाळा, विद्यार्थी व शिक्षकांची माहिती अद्ययावत करणाऱ्या शाळांमधील शिक्षकांचे वेतन थांबवण्यात यावे, असे आदेश समग्र शिक्षा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक प्रदीपकुमार डांगे यांनी दिले आहेत. त्यामुळे राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित शाळांना येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत यू-डायस प्लस प्रणालीमध्ये माहिती अद्ययावत करावी लागणार आहे.**



राज्यातील सर्व शासकीय, अनुदानित शाळांमधील भौतिक सुविधा, शिक्षक संख्या, विद्यार्थी संख्या आदी माहितीच्या आधारे राज्य व केंद्र शासनाकडून २०२४-२५, २०२५-२६ या वर्षासाठी वार्षिक नियोजन, अंदाजपत्रक तयार केले जाणार आहे. त्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत राज्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळांनी आवश्यक माहिती अद्ययावत करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु, बहुतांश शाळांनी त्याकडे दुर्लक्ष केले. माहिती अद्ययावत न झाल्यामुळे शाळेतील विद्यार्थी शासनाकडून देण्यात येणाऱ्या मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक सोयी सुविधा, शिष्यवृत्ती आदी गोष्टींपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत सर्व माहिती अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यु-डायस प्लस प्रणालीमधील अहवालानुसार, ८८ टक्के शाळांनी भौतिक माहिती अद्यावत केलेले आहे. ७६ टक्के शाळांमधील शिक्षकांची माहिती अंतिम करण्यात आली असून, ७१ टक्के विद्यार्थ्यांची माहिती अंतिम झालेली आहे.

मात्र, २५ हजार ७८८ शाळांनी शिक्षकांची माहिती भरण्याकरता अद्याप सुरुवातच केलेली नाही. तर १२ हजार ९४७ शाळा भौतिक माहिती भरण्यास चालढकल करत आहेत. त्यामुळे समग्र शिक्षा, स्टार्स व पीएम श्री योजनेचे वार्षिक नियोजन करण्यास विलंब होत आहे. शाळांकडून माहिती अद्यावत होत नसल्यामुळे संबंधित शाळांमधील शिक्षकांचे वेतन अदा करू नये.

जिल्हा व तालुका स्तरावरील वेतन पथकांनी शाळांकडून यु-डायस प्लस प्रणालीमध्ये शाळा, विद्यार्थी व शिक्षक यांची सर्व माहिती अद्यावत केल्याचे मुख्याध्यापकांकडून प्रमाणित करून घ्यावे. त्यानंतरच वेतन अदा करण्याबाबत परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. यू-डायस प्लस ऑनलाइन प्रणालीमध्ये शाळा, विद्यार्थी व शिक्षकांची माहिती अद्ययावत करणाऱ्या शाळांमधील शिक्षकांचे वेतन थांबवण्यात यावे, असे आदेश समग्र शिक्षा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक प्रदीपकुमार डांगे यांनी दिले आहेत. त्यामुळे राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित शाळांना येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत यू-डायस प्लस प्रणालीमध्ये माहिती अद्ययावत करावी लागणार आहे.राज्यातील सर्व शासकीय,

### माहिती अद्ययावत करण्याचे आदेश

» राज्यातील सर्व शासकीय, अनुदानित शाळांमधील भौतिक सुविधा, शिक्षक संख्या, विद्यार्थी संख्या आदी माहितीच्या आधारे राज्य व केंद्र शासनाकडून २०२४-२५, २०२५-२६ या वर्षासाठी वार्षिक नियोजन, अंदाजपत्रक तयार केले जाणार आहे. त्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत राज्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळांनी आवश्यक माहिती अद्ययावत करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु, बहुतांश शाळांनी त्याकडे दुर्लक्ष केले. माहिती अद्ययावत न झाल्यामुळे शाळेतील विद्यार्थी शासनाकडून देण्यात येणाऱ्या मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक सोयी सुविधा, शिष्यवृत्ती आदी गोष्टींपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अनुदानित शाळांमधील भौतिक सुविधा, शिक्षक संख्या, विद्यार्थी संख्या आदी माहितीच्या आधारे राज्य व केंद्र शासनाकडून २०२४-२५, २०२५-२६ या वर्षासाठी वार्षिक नियोजन, अंदाजपत्रक तयार केले जाणार आहे. त्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत राज्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळांनी आवश्यक माहिती अद्ययावत करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु, बहुतांश शाळांनी त्याकडे दुर्लक्ष केले. माहिती अद्ययावत न झाल्यामुळे शाळेतील विद्यार्थी शासनाकडून देण्यात येणाऱ्या मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक सोयी सुविधा, शिष्यवृत्ती आदी गोष्टींपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत सर्व माहिती अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यु-डायस प्लस प्रणालीमधील अहवालानुसार, ८८ टक्के शाळांनी भौतिक माहिती अद्यावत केलेले आहे. ७६ टक्के शाळांमधील शिक्षकांची माहिती अंतिम करण्यात आली असून, ७१ टक्के विद्यार्थ्यांची माहिती अंतिम झालेली आहे.

# दिवाळी सुट्टीतही विद्यार्थ्यांचा बालदिवस उत्साहात

## » विविध ‘अ‍ॅक्टिव्हीट’जद्वारे विद्यार्थ्यांची ‘ऑनलाईन’ धम्माल

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**बाल दिवस...म्हणजे विद्यार्थ्यांच्या आनंदाचा आणि उत्साहाचा दिवस. मात्र, यावर्षी दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे अनेक शाळांमध्ये ‘चिल्ड्रेन्स डे’ साजरा झाला नाही. याला अपवाद ठरले ते म्हणजे भोसरीतील गायत्री इंग्लिश मिडियम स्कूल. विद्यार्थी आणि पालकांबाबत आपुलकी निर्माण केलेल्या गायत्री स्कूल प्रशासनाने यावर्षी ‘ऑनलाईन’ बाल दिवस’ साजरा केला.**

स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या (एसव्हीएसपीएम) भोसरी येथील ग्रायत्री इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये प्रतिवर्षी बाल दिन (दि.१४ नोव्हेंबर) मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी दिवाळीच्या सुट्टी सुरू होत्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्कूलमध्ये धम्माल करता येणार नाही. त्यामुळे स्कूल प्रशासनाने ‘ऑनलाईन बाल दिवस’ साजरा करण्याचा नवा फंडा नियोजित केला. त्याला विद्यार्थ्यांसह पालकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ‘दिवाळी मेला’ च्या निमित्ताने स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी पणती बनवल्या होत्या. या उपक्रमातून प्रोत्साहन घेवून




त्यांनी स्वतः पणत्या आणल्या आणि सुशोभित करुन आपल्या नातेवाईकांना भेट दिल्या आहेत.

तसेच, विविध ‘अ‍ॅक्टिव्हीटी’ सादर करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे यावर्षीचा बालदिवसही संस्मरणीय झाला. यासाठी उपमुख्याध्यापिका प्रिया नेवाळे व श्रुती जोशी यांनी पुढाकार घेतला. पूर्व प्राथमिक विभागाच्या वृशाली आहिरे व त्यांच्या टीमने अतिशय सुंदर मुखवटे करुन मुलांचे मनोरंजन करण्याचा प्रयत्न केला. शाळेतील सर्व विभागाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी याकामी पुढाकार घेतला. संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष विनायक भोंगाळे, व्यवस्थापकीय संचालक कविता भोंगाळे, विश्वस्त सरिता विखे-पाटील यांनी या उपक्रमाचे कौतूक केले.



“बाल दिवस” हा प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील संस्मरणीय दिवस असतो. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त देशात बाल दिवस साजरा होतो. त्यांचे लहान मुलांचा जिव्हाळा असल्यामुळे त्यांना प्रेमाचे ‘चाचा नेहरु’ असे संबोधले जात असे. हा बाल दिवसाबाबतचा इतिहास आता नव्या पिढीला कळला पाहिजे. तसेच, मुलांचे शिक्षण आणि अधिकार याबाबत जागृती व्हायला पाहिजे. कारण, मुले हे देशाचे भविष्य आहेत.

**- विनायक भोंगाळे,** संस्थापक अध्यक्ष, एसव्हीएसपीएम, भोसरी.

# मतदान नोंदणी करायची? तर
# विशेष मोहिमेत सहभागी व्हा!

## नोंदणीसाठी चिंचवड विधानसभा मतदारसंघात दोन दिवस विशेष मोहीम

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जास्तीत-जास्त मतदार नोंदणी करण्यासाठी चिंचवड विधानसभा मतदारसंघात विशेष प्रयत्न केले जात आहेत. याच अनुषंगाने दि.25 आणि दि. 26 नोव्हेंबर रोजी दोन दिवस मतदार नोंदणीसाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत जास्तीत जास्त तरुण-तरुणी आणि ज्यांचे नाव नोंदणी करणे बाकी आहे, अशांनी सहभागी व्हावे, असे आवाहन 205 चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी तथा कर संकलन व कर आकारणी विभागाचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले आहे.**

भारत निवडणूक आयोगामार्फत दि.1 जानेवारी 2024 या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम घोषित केला आहे. या कार्यक्रमांतर्गत मतदानापासून वंचित राहिलेल्या नागरिकांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आली आहे. दि. 25 आणि दि. 26 नोव्हेंबर चिंचवड विधानसभेतील प्रत्येक मतदान केंद्रावर सकाळी 10 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत 'SPECIAL CAMP FOR VOTERS REGISTRATION' आयोजित केला आहे.



### ...हे फॉर्म भरुन द्यावे लागणार

- (फॉर्म नं 6) नवीन मतदार नोंदणीसाठी
- (फॉर्म नं 6 A) परदेशी मतदार म्हणून नोंदणीसाठी
- (फॉर्म नं 6 B) विद्यमान मतदारांव्दारे आधार क्रमांकाची माहिती
- (फॉर्म नं 7) आक्षेप आणि स्वतः हटवणे
- (फॉर्म नं 8) दुरुस्ती, स्थलांतर, डूप्लिकेट EPIC तसेच दिव्यांग व्यक्ती म्हणून चिन्हांकित करण्यासाठी हा अर्ज करावा.

### जनजागृती करण्यात येणार

**चिंचवड विधानसभा मतदार संघातील ज्या मतदार यादीत नाव नोंदविलेल्या मतदारांचे लिंग गुणोत्तर 910 पेक्षा कमी आहे, त्या विविध विभागात मतदार नोंदणीचे प्रमाण वाढविण्यासाठी जनजागृती करण्यात येणार आहे. यासाठी वॉर्ड स्तरावर महिला, तृतीय पंथीय, बांधकाम व्यवसायातील मजूर, सर्व सहकारी सोसायट्या, औद्योगिक आस्थापनेवरील कर्मचारी वर्ग, दिव्यांग, बेघर व्यक्ती आदींसाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.**



“ निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार चिंचवड विधानसभा मतदारसंघात मतदार नोंदणीसाठी दोन दिवस विशेष मोहीम आयोजित केली आहे. या मोहिमेत जास्तीत-जास्त पात्र नागरिकांनी 205 चिंचवड विधानसभा मतदार संघ कार्यालय, यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालय, थेरगाव, चिंचवड विधानसभा मतदार संघातील सर्व मतदान केंद्र येथे अर्ज जमा करावेत. तसेच ज्या नागरिकांना अर्ज भरणे शक्य नाही त्यांनी VOTERS.ECI.GOV.IN व VOTER HELPLINE APP वर जावून आपली नोंदणी करावी.

**-नीलेश देशमुख,**
**205 चिंचवड विधानसभा मतदार नोंदणी अधिकारी.**

---

# भोसरीमध्ये ढोल-ताशा स्पर्धेचा दणदणाट!

## आ. महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त स्पर्धा : नवचैतन्य तरुण मंडळ 'आमदार चषक'चे मानकरी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'आमदार चषक ढोल-ताशा' स्पर्धेत दापोडी येथील नवचैतन्य तरुण मंडळाने विजेतेपद पटकावले. या स्पर्धेच्या निमित्ताने ढोल-ताशांचा दणदणाट पहायला मिळाला..**



महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशनतर्फे भोसरीत आमदार चषक ढोल झांज स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. बाळासाहेब पवळे, कालिदास लांडगे, संतोष लांडगे आणि अशोक शेडगे यांनी आयोजनासाठी पुढाकार घेतला. स्पर्धेत एकूण १७ पथक सहभागी झाले. या स्पर्धेत नवचैत्यन्य तरुण मंडळ, दापोडी पथकाने आमदार चषकाचे मानकरी व प्रथम क्रमांक पटकावला. भैरवनाथ तरुण मंडळ, बोरज मावळ यांनी द्वितीय क्रमांक, रासाई तरुण मंडळ, वडगाव, शिरुर यांनी तृतीय क्रमांक पटकावला. तसेच, श्री भैरवनाथ तरुण मंडळ, काले मावळ चौथा, दत्त मंदिर, तरुण मंडळ, खडकी यांनी पाचवा, जय भवानी तरुण मंडळ, दिघी यांनी सहावा, सह्याद्री क्रीडा मंडळ, दिघी यांनी सातवा, कानिफनाथ तरुण मंडळ आढले, मावळ यांनी आठवा क्रमांक, भैरवनाथ तरुण मंडळ शिवणे, मावळ यांनी नववा आणि दहावा क्रमांक श्रीराम तरुण मंडळ, धनगव्हन मावळ यांनी पटकावला आहे.

### बालकलाकार अर्णव पराडेला पुरस्कार...

वैयक्तिक पारितोषिकमध्ये शिस्तबद्ध संघ दत्त मंदिर तरुण मंडळ, उत्कृष्ठ ढोलवादक विशाल दहिभाते, उत्कृष्ट ताशावादक मनोज धारवाड, उत्कृष्ट घंटावादक राम जाधव, उत्कृष्ट झांज वादक जानव्ही वाळके यांना प्रदान करण्यात आले. बालकलाकार अर्णव परांडे यांना उत्कृष्ट ताशावादक पुरस्कार दिला. सूत्रसंचालन सतीश काकडे, गणेश लांडगे यांनी केले. पंच म्हणून अक्षय लांडगे, आशिष लांडगे, रोहिदास फुगे, रविंद्र यादगिरी यांनी काम पाहिले.

### 'जॉब फेअर'मध्ये 889 युवकांना मिळाला रोजगार!

तसेच, भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त दिघी येथे 'जॉब फेअर' चे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकाच दिवसात तब्बल ८८९ युवकांना नोकरीची संधी मिळाली. भाजपाचे माजी नगरसेवक विकास डोळस आणि शहर चिटणीस कुलदीप परांडे यांच्या पुढाकाराने हा नोकरी मेळावा घेण्यात आला. त्याला परिसरातील युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### चिखली येथे खेळ रंगला पैठणीचा...

**चिखली येथील रिव्हर रेसिडेन्सी येथे माजी महापौर राहुल जाधव यांच्या पुढाकाराने आकाश फल्ले प्रस्तुत 'खेळ रंगला पैठणीचा' कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रथम क्रमांक फ्रिज, द्वितीय गॅस शेगडी, मिस्कर टेबल फॅन यासह मानाची पैठणी आणि भेटवस्तू अशी बक्षीसे देण्यात आली. यावेळी उद्योजक निखिल बोऱ्हाडे, निलेश बोराटे, सामाजिक कार्यकर्त्या मंगल जाधव, सोनम जांभूळकर, ॲड. महेश लोहारे आदी उपस्थित होते.**




# विद्यार्थी कोचिंग क्लासमध्ये प्रवेश घेतात

**राजस्थानातील कोटा शहरासह देशभरात अनेक ठिकाणी विद्यार्थी आत्महत्येच्या घटना गेल्या काही महिन्यांत नोंदविल्या गेल्या. कोटा शहरात वर्षभरात तब्बल २४ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली होती. कोटासह देशभरातील प्रशिक्षण केंद्रांचे नियमन सरकारने करावे, अशी विनंती याचिकाकर्त्यांना केली होती.**

सर्वोच्च न्यायालयाने २० नोव्हेंबरला या याचिकेवर सुनावणी केली आणि पालकांचा दबाव हेच आत्महत्यांमागचे प्रमुख कारण असल्याचे म्हटले. मात्र कोटा येथील वास्तव काय आहे, हे जाणून घेण्यासाठी 'सेंटर फॉर स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज'च्या 'लोकनीति केंद्रा'तर्फे आक्टोबर २०२३ च्या पहिल्या आठवड्यात कोटा येथे शिकणाऱ्या एक हजार विद्यार्थी/ विद्यार्थिनींचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यातून पुढे आलेले निष्कर्ष विचारप्रवृत्त करणारे आहेत. 'आपण येथेच का आलात', 'कोणत्या प्रवेश परीक्षेसाठी प्रशिक्षण घेत आहात', 'कितव्यांदा या परीक्षेला बसत आहात' इ. मुद्द्यांवर सर्वेक्षण करण्यात आले. त्यातून असे दिसून आले की, येथे येणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ३७ टक्के विद्यार्थिनी आहेत. येथील प्रवेश परीक्षेसाठी किमान १२वी पास होण्याची अट असल्यामुळे हे विद्यार्थी १५-१९ वयोगटातील आहेत.



बहुतेक विद्यार्थी बिहार (३२ टक्के), उत्तर प्रदेश (२३ टक्के), राजस्थान (१८ टक्के) व मध्य प्रदेश (११ टक्के) येथून आलेले आहेत. यातील ५० टक्क्यांहून अधिक विद्यार्थी त्या त्या राज्यांतील लहान मोठ्या शहरांतून आलेले आहेत व खेड्यातील विद्यार्थ्यांची संख्या केवळ ११ टक्के आहे. बहुतेक सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांची पार्श्वभूमी मध्यमवर्गीय आहे. २७ टक्के विद्यार्थ्यांचे पालक सरकारी नोकरीत आहेत. २१ टक्के विद्यार्थ्यांच्या पालकांचा स्वतःचा व्यवसाय आहे, तर अवघे चार टक्के विद्यार्थी शेतकरी वर्गातील आहेत. कोटा येथे येण्यामागची कारणे शोधताना असे लक्षात आले की इतर कोणालातरी तिथे शिकल्याचा लाभ झाला, नात्यातील किंवा परिचयातील कोणाला तरी येथे शिकल्यामुळे प्रवेश परीक्षेत उत्तम गुण मिळाले, त्यामुळे आपल्या पाल्यालाही असेच घवघवीत यश मिळेल, असा विचार दिसतो. १३ टक्के विद्यार्थ्यांचे अगदी जवळचे नातेवाईक/ पालक कोटा येथील कोचिंग क्लासमध्ये शिकले आहेत. २८ टक्के विद्यार्थ्यांच्या दूरच्या नातेवाईकांनी कोटा येथील प्रशिक्षणाचा अनुभव घेतला आहे. त्यांच्याकडूनच त्यांना कोटाबद्दलची माहिती मिळाली आहे. ५३ टक्के विद्यार्थ्यांचे कुठलेही नातेवाईक कोटा येथे शिकलेले नाहीत. ४३ टक्के विद्यार्थ्यांना कोटाबद्दलची माहिती समाजमाध्यमातून मिळालेली होती. सुमारे ४६ टक्के विद्यार्थी कोटा येथील कोचिंग क्लासेसची 'यशोगाथा' ऐकून/ वाचून आलेले होते. ३९ टक्के विद्यार्थी पालकांच्या आग्रहास्तव व १० टक्के कोटा येथे शिकणाऱ्या मित्रांमुळे येथे आले. येथे येणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी नीट या मेडिकल शिक्षणाच्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ५९ टक्के आहे. त्यातही विद्यार्थिनींचे प्रमाण ७६ टक्के आहे. उर्वरित विद्यार्थी जेईई या अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेची तयारी करणारे आहेत. त्यात विद्यार्थिनींची संख्या केवळ १६ टक्के आहे. यातील सुमारे ५० टक्के विद्यार्थी प्रथमच स्पर्धा परीक्षा देणार आहेत. २६ टक्के दुसऱ्यांदा व १३ टक्के विद्यार्थी तिसऱ्यांदा परीक्षा देण्यासाठी तयारी करण्यासाठी येथे आलेले आहेत. २९ टक्के विद्यार्थी कोटा येथे येण्यापूर्वी अन्य कोणत्या तरी ठिकाणी प्रशिक्षण घेऊन आलेले आहेत. मात्र तिथे मिळणारे शिक्षण समाधानकारक नसल्याने त्यांनी कोटाचा पर्याय स्वीकारला आहे. प्रत्यक्षात परीक्षेत अपयश आल्यामुळे त्यांना वैफल्य आले असावे, असे त्यांनी दिलेल्या उत्तरांतून दिसते. कोटा येथे शिक्षण घेतल्यानंतरही प्रवेश परीक्षेत अपयशच आले, तर पुढे काय, याचे उत्तर शोधणाऱ्यांत आत्महत्या हा पर्याय समोर ठेवणाऱ्यांचे प्रमाण जास्त असावे, असे दिसते.येथील प्रवेश परीक्षेसाठी १२वी उत्तीर्ण होण्याची अट असल्यामुळे त्या त्या राज्यातील अधिकृत बोर्ड परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी नियमितपणे हायस्कूलचे शिक्षणही घेतलेले असणे अपेक्षित असते. परंतु सर्वेक्षणात फक्त १६ टक्के विद्यार्थी नियमितपणे हायस्कूलमध्ये गेलेले असतात, असे दिसून आले. इतर तब्बल ८१ टक्के विद्यार्थी 'डमी स्कूल'मधून दूरस्थ (डिस्टन्ट) पद्धतीने परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेले असतात.

## संपादकीय »

### वाघांचा वानप्रस्थ!

***ऐन उमेदीच्या काळात वलयांकित आयुष्य जगणाऱ्याला आयुष्याच्या उत्तरार्धात एकाकीपणाला सामोरे जावे लागणे ही मानवी जीवनात तशी सामान्य बाब.***

ऐन उमेदीच्या काळात वलयांकित आयुष्य जगणाऱ्याला आयुष्याच्या उत्तरार्धात एकाकीपणाला सामोरे जावे लागणे ही मानवी जीवनात तशी सामान्य बाब. एखाद्याचे असे एकाकीपणात जगणे समोर आले की समाजमन हळहळते. अनेकदा याचा उलगडा त्याच्या मृत्यूनंतरच होतो. तेव्हा या हळहळीची तीव्रता अनेकदा अनुभवास येते. काही वर्षांपूर्वी परवीन बाबीचा झालेला मृत्यू किंवा अगदी अलीकडे रवींद्र महाजनींना आलेले मरण ही त्यातली प्रातिनिधिक ठरावी अशी उदाहरणे. मानव असो वा प्राणी, कुठल्याही सजीवाच्या बाबतीत हे घडायला नको यासाठी आपल्याकडून कृतीपर हालचाली होतात का? काया, वाचा, मन असलेल्या मानवाच्या व्यक्तिगत आयुष्यात कशाला डोकवायचे असे म्हणत त्याच्या एकाकी जगण्याकडे दुर्लक्ष करणे एखादवेळी समजून घेता येईल, पण फक्त काया व मन असलेल्या प्राण्यांच्या बाबतीत ही भूमिका योग्य कशी ठरू शकते?

**मुलांचं जग भाबडं, निरागस समजण्याची आपल्या साहित्यात एक परंपरा आहे. तिला छेद जाईलसं मुलांचं विश्व आपल्याला इथे सापडतं. जे झालं त्याला स्वत: जोनी कितपत जबाबदार होती? तिच्या हल्लेखोरांची त्यात काय भूमिका होती? हे चित्र आपल्यापुढे मांडणाऱ्या अॅलेकने ते आपल्या फायद्यासाठी विशिष्ट तऱ्हेने मांडलं का? या गुन्ह्याची काहीच जबाबदारी आपल्यापर्यंत पोहोचत नाही का? असे प्रश्नही त्यातून पडतात..**

# गढूळलेल्या जगाचा राशोमॉन इफेक्ट

अकिरा कुरोसावाच्या 'राशोमॉन' (१९५०) या प्रख्यात चित्रपटाने 'राशोमॉन इफेक्ट' हा शब्दप्रयोग प्रचलित केला. मूळ चित्रपटात होती एक गुन्ह्याची घटना. या गुन्ह्याशी थेट जोडलेले तीन, आणि साक्षीदाराचा चौथा, अशा चार दृष्टिकोनांतून चित्रपटातला गुन्हा आपल्याला दाखवला जातो. पण या चार दृष्टिकोनांपलीकडे जाणारी गुन्ह्याची उकल, त्यामागे दडलेलं निर्विवाद सत्य असं म्हणून वेगळं काहीही दाखवलं जात नाही. याचा अर्थ सोपा आहे. दिग्दर्शकाच्या मते पूर्ण सत्य ही गोष्टच अस्तित्वात नाही. ते दर माणसानुसार बदलतं. व्यक्तिसापेक्ष असणं हाच सत्याचा गुणधर्म आहे. एका घटनेकडे वेगळ्या नजरेने पाहाता ती वेगळीच भासणं, हा 'राशोमॉन इफेक्ट', आणि त्याचा वापर साहित्य, नाट्य, चित्रपट, यात विपुल प्रमाणात झालेला पाहायला मिळतो. एलायजा क्लार्कच्या 'पेनन्स' या कादंबरीत तो मोठ्या प्रमाणात आहे, पण तो आजच्या काळाशी ज्या प्रखरतेने




जोडला जातो, ती प्रखरता आपल्याला क्वचित पाहायला मिळते. आपण ज्या काळात राहातो आहोत, त्याचं एक भेदक चित्र ही कादंबरी आपल्यासमोर मांडते. क्लार्कची ही दुसरी कादंबरी.

याआधी तिची 'बॉय पार्ट्स' नावाची कादंबरी गाजली आहे. पण आशय, कथनशैली या साऱ्याच बाबतीत 'पेनन्स' तिच्यापेक्षा खूप वेगळी आहे. 'पेनन्स' सत्य घटनेवर आधारलेली नसली, आपल्याकडे 'ट्रू क्राइम इन्डस्ट्री' अमेरिका, युरोपाइतकी पसरलेली नाही; पण मोजक्या मालिका, पुस्तकं, यांमधून हळूहळू त्याचं दर्शन व्हायला लागलंय. शिवाय 'ओटीटी'वर येणाऱ्या परकीय मालिकांमधून त्याचा वापर अधिक सफाईने केलेला दिसतो. ब्लॉग्ज, पॉडकास्ट यांमध्येही त्याचा शिरकाव जाणवायला लागला आहे. बेसिकली या माध्यमात लेखक/ होस्ट हा एखाद्या घडून गेलेल्या गुन्ह्याचा नव्याने विचार करून पाहातो.

तो गुन्हा घडण्यामागचा कार्यकारणभाव (आणि कधीकधी खरा गुन्हेगारही) शोधण्याचा प्रयत्न त्याने करणं अपेक्षित असतं. गुन्ह्याचा तपशील, मीडिया एक्स्पोजर, संबंधितांच्या मुलाखती, संशोधनातून समोर आलेली नवी माहिती, असल्यास फोटो/ व्हिडीओ, हे सारं पडताळून सत्याची चाचपणी सुरू होते. 'पेनन्स'मधला इंग्लंडमधल्या समुद्रकिनारी वसलेल्या एका छोट्या गावात घडणारा गुन्हा हा तसा भयानक आहे. २३ जून २०१६ रोजी पहाटे साडेचारच्या सुमाराला १६ वर्षांची जोनी विल्सन हिला जाळून मारल्याचा आरोप तिच्या वर्गातल्या तीन मुलींवर झाला आणि त्यासाठी त्यांना शिक्षाही झाली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# यात्रा सुरु असतानाच स्वच्छता मोहीम!

## एका दिवसात 125 टन कचरा उचलला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कार्तिकी यात्रा सुरु असतानाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घालून दिलेल्या आषाढी पॅटर्न प्रमाणे यंदा कार्तिकीलाही एकादशीच्या रात्री पासून सफाई मोहिमेला सुरुवात झाली. शुक्रवार, सायंकाळपर्यंत 125 टन कचरा उचलण्यात आला आहे. यात्रा कालावधीत लाखो भाविकांच्या उपस्थितीमुळे शहराला कचराकुंडीचे स्वरूप येत असते आणि यातूनच मोठ्या प्रमाणात साथीच्या रोगांचे थैमान सुरु होते.**



हे बदलण्यासाठी आषाढी यात्रेला मुख्यमंत्र्यांनी सफाईसाठी एक पॅटर्न घालून दिला आणि याच पद्धतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कार्तिकीलाही याची अंमलबजावणी सुरू केली. त्याच्या परिणामी आज द्वादशीला शहरातील तब्बल 125 टन कचरा हटविण्यात आला आहे . सोलापूर जिल्ह्यातील सर्व 13 नगरपालिका मुख्याधिकारी आणि त्यांचे सफाई कर्मचारी, यात्रेसाठी रुजू करण्यात आलेले हंगामी कर्मचारी आणि मंदिर समितीच्या कंत्राटदारांचे असे एकूण दोन हजार सफाई कर्मचारी एकादशीच्या रात्रीपासूनच कामाला लागले होते. त्यामुळे शहरातील कचरा, अस्वच्छता मोठ्या प्रमाणात साफ होण्यास सुरुवात झाली आहे.

अजूनही भाविकांचा निवास असणारे 65 एकरांवरील भक्तिसागर, चंद्रभागा वाळवंट आणि मंदिर परिसरात मोठ्या संख्येने भाविक असल्याने या भागात रात्री सफाई काम होत आहेत. ज्या ठिकाणचे भाविक गेले आहेत त्या ठिकाणी सफाई केली जात आहे.

दोन दिवसात संपूर्ण शहर स्वच्छ करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्याने आता उद्या संध्याकाळीपर्यंत शहर चकाचक होऊन जाणार आहे. सध्या शहरासह, 65 एकर, नदीपात्र वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग, दर्शनबारी पत्राशेड गोपाळपुर रोड, मंदिर परिसर येथे सफाईचे काम केले जात आहे. या भागात सफाई करताना जंतुनाशक फवारणीसह, मॅलेथॉन पावडर, ब्लिचिंग पावडर वेळोवेळी टाकण्यात येत आहे. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत तसेच 41 घंटागाडी द्वारेही कचरा गोळा करण्याचे काम अहोरात्र चालू आहे. शहरामध्ये कचरा त्वरीत उचलण्यासाठी आरोग्य विभागाकडील चार टिपर, दोन कॉम्पॅक्टर, एक डंपरप्लेसर, चार डंपिंग ट्रॉलिने आणि जेसीबीच्या सहाय्याने कचरा उचलला जात आहे. सफाई होताच त्याठिकाणी फवारणी देखील करण्यात येत आहे.

### उद्या संध्याकाळीपर्यंत शहर चकाचक

» दोन दिवसात संपूर्ण शहर स्वच्छ करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्याने आता उद्या संध्याकाळीपर्यंत शहर चकाचक होऊन जाणार आहे. सध्या शहरासह, 65 एकर, नदीपात्र वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग, दर्शनबारी पत्राशेड गोपाळपुर रोड, मंदिर परिसर येथे सफाईचे काम केले जात आहे. या भागात सफाई करताना जंतुनाशक फवारणीसह, मॅलेथॉन पावडर, ब्लिचिंग पावडर वेळोवेळी टाकण्यात येत आहे. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत तसेच 41 घंटागाडी द्वारेही कचरा गोळा करण्याचे काम अहोरात्र चालू आहे. शहरामध्ये कचरा त्वरीत उचलण्यासाठी आरोग्य विभागाकडील चार टिपर, दोन कॉम्पॅक्टर, एक डंपरप्लेसर, चार डंपिंग ट्रॉलिने आणि जेसीबीच्या सहाय्याने कचरा उचलला जात आहे. सफाई होताच त्याठिकाणी फवारणी देखील करण्यात येत आहे.

# फडणवीसांच्या निर्णयाला केसरकरांचं आव्हान?

## पोलीस अधिकारी तुषार दोशींच्या बदलीला स्थगितीची मागणी

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आंतरवाली सराटीमधील पोलीस अधिकारी तुषार दोशींच्या (IPS TUSHAR DOSHI) बदलीला स्थिगिती देण्याची मागणी केलीये. यासंदर्भात केसरकरांनी मुख्यमंत्री शिंदेंना (EKNATH SHINDE) पत्र देखील लिहिलं आहे. त्याच पार्श्वभूमीवर दीपक केसरकर यांनी एबीपी माझाशी संवाद साधला. चौकशी सुरु असलेल्या अधिकाऱ्याची अशा प्रकारे पोस्टिंग करणे चुकीचे असल्याचं केसरकरांनी म्हटलं आहे.**



### पुन्हा मराठा समाजामध्ये गैरसमज

» मनोज जरांगे यांचे अंतरवाली सराटीत उपोषण सुरू असताना, पोलीस आणि आंदोलकांमध्ये राडा झाला. त्यानंतर पोलिसांकडून लाठीमार तर आंदोलकांनी दगडफेक केल्याचा आरोप झाला. मात्र, त्यानंतर जालन्यात घडलेल्या या घटनेचे पडसाद संपूर्ण राज्यभरात पाहायला मिळाले. ठिकठिकाणी मराठा बांधव रस्त्यावर उतरून आंदोलन करू लागले.काही ठिकाणी हिंसाचाराच्या घटना समोर आल्या. दुसरीकडे, विरोधकांनीही सरकारवर टीकास्त्र डागले. तर, लाठीमार करणाऱ्या पोलिसांवर कारवाईची मागणी होऊ लागली.

जालना येथील अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी उपोषणास बसलेल्या आंदोलकांवर जालना पोलिसांनी अमानुष लाठीमार केला असल्याचा आरोप झाला होता. त्यांमुळे या घटनेच्या विरोधात राज्यभरात संतापाचे वातावरण पाहायला मिळत होते. त्यानंतर, या सर्व प्रकरणाची गृह विभागाने गंभीर दखल घेत जालना पोलीस अधीक्षक तुषार दोषी यांच्यावर पहिली कारवाई केली. पोलीस अधीक्षक दोषी यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्याचे आदेश गृह विभागाने काढले होते. मात्र, आता दोषी यांची जालना येथून बदली करण्यात आली आहे. तुषार दोषी यांची बदली पुण्यातील गुन्हे अन्वेषण विभागाच्या पोलीस अधीक्षक पदी बदली करण्यात आली आहे. नक्कीच मी मुख्यमंत्र्यांना या संदर्भात पत्र लिहिले होते, कारण आरक्षणाच्या मुद्द्यावरून संपूर्ण महाराष्ट्र पेटलेला आहे. त्यातच चौकशी सुरू असलेल्या अधिकाऱ्याला अशा प्रकारची पोस्टिंग देणे चुकीचे वाटले, त्यांची पोस्टिंग थांबवून काही काळ हेडक्वार्टरमध्ये काम करता येईल.

चौकशी पूर्ण झाल्यानंतर पुढचे बघता येईल, म्हणून मी ही पोस्टिंग थांबावी यासाठी पत्र लिहिले होते. हुतात्मा दिनाच्या कार्यक्रमाच्या दिवशी मला मुख्यमंत्री भेटले आणि त्या दिवशी त्यांना विषय समजावून सांगून मी पत्र देखील दिले. जर तेव्हा देवेंद्र फडणवीस देखील उपस्थित असते तर त्यांना देखील मी हे पत्र दिले असते आणि हा विषय समजावून सांगितला असता प्रत्येक वेळी गृहमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस हेच बदली करतात असे नाही.

# मुंबईत सायबर गुन्ह्यांत मोठी वाढ!

।मुंबई।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

मुंबईतील वेगवेगळ्या प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये चढउतार होत असला तरी सायबर गुन्ह्यांचा आलेख मात्र चढताच आहे. 'प्रजा फाऊंडेशन' या संस्थेच्या वतीने जारी केलेल्या आकडेवारीवरून ही माहिती समोर आली आहे. 'प्रजा'ने दिलेल्या आकडेवारीनुसार, २०१८ ते २०२२ या कालावधीत सायबर गुन्ह्यांमध्ये तब्बल २४३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. सायबर गुन्हेगार सापडण्याचे प्रमाण मात्र केवळ ८ टक्के असल्याचे या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

सायबर गुन्हेगारीतील वाढ चिंताजनक आहे. २०१८ मध्ये १३७५ सायबर गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. तर २०२२ मध्ये सायबर गुन्ह्यांमध्ये ४७२३ पर्यंत वाढ झाली. यात क्रेडिट आणि डेबिट कार्ड फसवणुकीचे सर्वाधिक गुन्हे आहेत. २०१८ मध्ये ४६१ तर तेच गुन्हे २०२२ मध्ये ३४९० वर पोहोचले आहेत. २०२२




च्या सायबर गुन्ह्यांमधील गुन्हेगार सापडण्याचे प्रमाण केवळ ८ टक्के इतके आहे. महिला अत्याचारांतही वाढ मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. दहा वर्षांत (२०१३ ते २०२२) बलात्कार आणि विनयभंगाच्या नोंदवलेल्या गुन्ह्यांमध्ये अनुक्रमे १३० टक्के आणि १०५ टक्के वाढ झाली आहे. २०१३ मध्ये बलात्काराचे ३९१ गुन्हे तर २०२२ मध्ये ९०१ गुन्हांची नोंद झाली आहे. विनयभंगाचे २०१३ मध्ये ११३७ गुन्हे होते, २०२२ मध्ये ही संख्या २३२९ वर पोहोचली आहे. २०२२ मध्ये दाखल बलात्काराच्या गुन्ह्यांपैकी ६३ टक्के गुन्हे अल्पवयीन मुलींवरील बलात्काराचे आहेत. पोक्सो अंतर्गत दाखल गुन्ह्यांपैकी ७३ टक्के गुन्ह्यांचा तपास प्रलंबित आहे.

# काँग्रेस नेते 'बीआरएस'मध्ये येतील!

## तेलंगणचे मुख्यमंत्री चंद्रशेखर राव यांचा दावा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

"काँग्रेसचे उमेदवार निवडून आल्यानंतर आम्ही भारत राष्ट्र समितीत (बीआरएस) सामील होऊ, अशी मतदारांना ग्वाही देऊन असे सांगून मते मागत असल्याचा दावा भारत राष्ट्र समितीचे प्रमुख आणि तेलंगणचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी शुक्रवारी केला. येथील कोळसा खाण परिसरात निवडणूक प्रचार सभेत ते बोलत होते.





राव यांनी आरोप केला, की पूर्वीच्या काँग्रेस राज्यकर्त्यांच्या अपयशामुळे राज्य सरकारला 'एससीसीएल'मधील ४९ टक्के हिस्सा विकावा लागला. काँग्रेसच्या मंडळींना आपला पराभव निश्चित असल्याची खात्री पटल्याने त्यांनी नवाच प्रचार सुरू केला आहे. निवडून आल्यास आम्ही 'बीआरएस'मध्ये सामील होऊ, असे आश्वासन ते आता मतदारांना देत आहेत असा दावा केसीआर यांनी केला. भाजपवर टीका करताना राव म्हणाले, की भाजप सत्ताधारी असलेल्या केंद्र सरकारने तेलंगणाला एकही वैद्यकीय महाविद्यालय किंवा नवोदय शाळा दिली नाही. या पक्षाला तेलंगणवासीय मते का देतील? भाजपला मतदान करणे म्हणजे मते नाल्याच्या पाण्यात वाहून वाया जाण्यासारखे आहे. काँग्रेसनेच १९५६ मध्ये तेलंगणचे आंध्र प्रदेशात विलीनीकरण केले, परिणामी तेलंगणला ५० वर्षे त्रास सहन करावा लागला. आश्वासन दिल्यानंतरही काँग्रेसने तेलंगणची स्वतंत्र स्थापना करण्यात विलंब केला. यावेळी राव यांनी आपल्या सरकारने केलेल्या कामगिरीचा तपशील सांगून, 'बीआरएस'च्या उमेदवारांना मते देण्याचे आवाहन केले.

तेलंगणच्या 'सिंगरेनी कॉलियरीज कंपनी लिमिटेड'ऐवजी (एससीसीएल) ऑस्ट्रेलियातील अदानी समूहाच्या कोळसा खाणीतून कोळसा आयात केला जाईल असे पंतप्रधान नरेंद्र मोदी सांगत असल्याचा आरोपही राव यांनी केला. भारत राष्ट्र समितीचे (बीआरएस) अध्यक्ष आणि तेलंगणचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव (केसीआर) यांनी हजारो कोटी रुपयांचा घोटाळा केला असल्याचा आरोप केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शुक्रवारी केला. आरमुर येथे प्रचारसभेत बोलताना शहा म्हणाले की, "आपल्याविरुद्ध कोणतीही कारवाई होणार नाही, या भ्रमात त्यांनी राहू नये. भाजप तेलंगणमध्ये सत्तेवर आल्यास या भ्रष्टाचाराची चौकशी केली जाईल आणि दोषी ठरणाऱ्यांना कारावासात पाठवले जाईल. आपल्या भाषणात शहा म्हणाले की, हजारो कोटींचा भ्रष्टाचार करून 'केसीआर' यांना असे वाटत आहे की, त्यांच्याविरुद्ध काहीही होणार नाही. त्यांनी या प्रकरणी भ्रमात राहू नये. त्यांची घटका भरत आली आहे. या सर्व घोटाळ्यांची भाजप सरकारकडून चौकशी केली जाईल आणि दोषी ठरणाऱ्यांना कारावासाची शिक्षा ठोठावली जाईल. भ्रष्टाचारात 'केसीआर' सरकारने कोणताही विधिनिषेध ठेवलेला नाही. 'मियांपूर जमीन घोटाळा', 'कविताजी यांचा मद्य घोटाळा' 'बाह्यवळण रस्ता घोटाळा' आदींचा उल्लेख शहा यांनी यावेळी केला. तेलंगणमध्ये भाजप सत्तेवर आल्यास मुस्लिमांसाठीचा चार टक्के आरक्षित वाटा रद्द करण्यात येईल. त्याचा लाभ इतर मागासवर्गीय (ओबीसी) आणि अनुसूचित जमातींना देण्यात येईल

### केसीआर यांचा भ्रष्टाचार : अमित शहा

आपल्या भाषणात शहा म्हणाले की, हजारो कोटींचा भ्रष्टाचार करून 'केसीआर' यांना असे वाटत आहे की, त्यांच्याविरुद्ध काहीही होणार नाही. त्यांनी या प्रकरणी भ्रमात राहू नये. त्यांची घटका भरत आली आहे. या सर्व घोटाळ्यांची भाजप सरकारकडून चौकशी केली जाईल आणि दोषी ठरणाऱ्यांना कारावासाची शिक्षा ठोठावली जाईल. भ्रष्टाचारात 'केसीआर' सरकारने कोणताही विधिनिषेध ठेवलेला नाही. 'मियांपूर जमीन घोटाळा', 'कविताजी यांचा मद्य घोटाळा' 'बाह्यवळण रस्ता घोटाळा' आदींचा उल्लेख शहा यांनी यावेळी केला. तेलंगणमध्ये भाजप सत्तेवर आल्यास मुस्लिमांसाठीचा चार टक्के आरक्षित वाटा (कोटा) रद्द करण्यात येईल. त्याचा लाभ इतर मागासवर्गीय (ओबीसी) आणि अनुसूचित जमातींना देण्यात येईल. तसेच अयोध्या येथील राममंदिराच्या दर्शनासाठी मोफत अयोध्या वारी करण्याचे आश्वासनही शहा यांनी यावेळी दिले.

---

# अंबानी देशातील सर्वात मोठे कर्जदार!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

आशियातील सर्वात श्रीमंत उद्योगपती मुकेश अंबानी यांची कंपनी रिलायन्स इंडस्ट्रीजवर सध्या सर्वाधिक कर्ज आहे. आश्चर्याची बाब म्हणजे या यादीत अदानी कंपनीचे नाव नाही. टाटांची कंपनी प्रसिद्ध आहे, पण तिचे कर्ज रिलायन्सपेक्षा खूपच कमी आहे. व्होडाफोन आयडियाच्या कर्जाबद्दल बरीच चर्चा आहे, परंतु रिलायन्सच्या तुलनेत ते खूपच कमी आहे.

या यादीत एअरटेल आणि एल अँड टी यांचेही नाव आहे. मात्र, या सर्व कंपन्या मुकेश अंबानींच्या रिलायन्सपेक्षा खूप खाली आहेत. रिलायन्ससह देशाच्या कोणत्या कंपनीवर किती कर्ज आहे त्याबद्दलही माहिती जाणून घेऊयात.

2020 मध्ये मुकेश अंबानी यांनी रिलायन्स इंडस्ट्रीज ही कर्जमुक्त कंपनी बनल्याची घोषणा केली होती.

त्यावेळी देश कोरोना महामारीचा सामना करत होता. मुकेश अंबानी आपल्या कंपन्यांची इक्विटी विकून जगातील मोठ्या कंपन्यांकडून निधी उभारत होते. आता ताज्या आकडेवारीनुसार, रिलायन्स ही देशातील सर्वात मोठी कर्जदार कंपनी बनली आहे. ACE EQUITY च्या आकडेवारीनुसार, देशातील सर्वात मोठी कर्जदार कंपनी रिलायन्स इंडस्ट्रीज आहे. या कंपनीवर 3.13 लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे.

एनटीपीसीचे नाव देशातील मोठ्या ऊर्जा क्षेत्रातील कंपन्यांमध्ये समाविष्ट आहे. कर्जदार असण्याच्या बाबतीत ही कंपनी दुसऱ्या क्रमांकावर आहे. या कंपनीवर 2.20 लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे.

---


# चीनमध्ये आणखी एका रोगाचा प्रादूर्भाव

## भारतातील लहान मुलांना किती धोका?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

कोरोनाच्या (CORONA VIRUS UPDATES) उद्रेकाचं केंद्रबिंदू ठरलेल्या चीननं पुन्हा एकदा संपूर्ण जगाची धाकधूक वाढवली. रहस्यमयी आजाराचा चीनमधील लहान मुलांमध्ये संसर्ग झाल्याची माहिती मिळत आहे. त्यानंतर यामुळे भारतामध्येही अनेक चर्चेला उधाण आले होते. पण आता केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून याबाबत अधिकृत परित्रक काढत माहिती दिली आहे. H9N2 व्हायरसची प्रकरणे आणि श्वसनाच्या आजारासंबंधी झालेल्या उद्रेकावर भारत सरकार लक्ष ठेवून आहे.



आरोग्य मंत्रालयाने काढलेल्या प्रसिद्धीपत्रकामध्ये म्हटलंय की, चीनमधून नोंदवलेले एव्हीयन इन्फ्लूएंझा प्रकरणे आणि श्वासोच्छवासाच्या आजारांचा भारतात कमी धोका आहे, असे प्रसिद्धीपत्रकात सांगण्यात आलेय. त्याशिवाय जागतिक आरोग्य संघटनाही या आजाराकडे लक्ष ठेवून असल्याचे सांगण्यात आलेय. केंद्रीय आरोग्य मंत्रालय उत्तर चीनमधील H9N2 चा प्रादुर्भाव आणि मुलांमधील वाढत्या श्वसन आजाराच्या प्रकरणांवर बारीक लक्ष ठेवून आहे.

चीनमध्ये आढळलेले एव्हीयन इन्फ्लूएन्झा प्रकरण तसेच श्वसनाच्या आजारापासून भारताला कमी धोका आहे.

काही माध्यमांच्या वृत्तात उत्तर चीनमधील मुलांमध्ये श्वसनाच्या आजाराच्या वाढत्या संख्येचा उल्लेख आहे आणि याबाबत जागतिक आरोग्य संघटना म्हणजेच WHO ने एक निवेदन देखील जारी केले आहे. सध्या उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे, चीनमध्ये गेल्या काही आठवड्यांमध्ये श्वसनाच्या आजारांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले आहे. चीनमध्ये ऑक्टोबर 2023 मध्ये H9N2 (एव्हियन इन्फ्लूएन्झा विषाणू) चा संसर्ग एका व्यक्तीला झाल्याचे आढळून आला. त्यानंतर देशात एव्हीयन इन्फ्लूएंझाच्या मानवी प्रकरणांविरूद्धच्या तयारीबाबत चर्चा करण्यासाठी आरोग्य सेवा महासंचालनालयाच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक बैठक आयोजित करण्यात आली होती. ज्याचा अहवाल जागतिक आरोग्य संघटनेला देण्यात आला होता. आरोग्य संघटनेने केलेल्या एकूण जोखीम मूल्यमापनात त्यांच्याकडे आतापर्यंत नोंदवलेल्या H9N2 च्या मानवी प्रकरणांमध्ये मनुष्याकडून दुसऱ्या मनुष्याकडे संसर्ग पसरण्याची शक्यता कमी असून मृत्यूचे प्रमाण कमी असल्याचे आढळले आहे.

# दिवाळीच्या आधी मुलाला भेट दिला बंगला



बिग बी अमिताभ बच्चन यांनी जुहू भागातला प्रतीक्षा बंगला आपल्या मुलीच्या नावावर केला आहे. बच्चन कुटुंबीय आधी याच बंगल्यात राहायचं. काही वर्षांपूर्वी ते जलसा बंगल्यात राहायला गेले. दरम्यान हा करार 8 नोव्हेंबर रोजी रजिस्टर करण्यात आला. त्यासाठी बच्चन यांनी 50 लाख रुपयांची स्टॅम्प ड्यूटी भरल्याचं देखील समजतंय. या बंगल्याची मार्केट व्हॅल्यू 50 कोटी 83 लाख इतकी आहे. हा बंगला दोन प्लॉटवर उभारण्यात आलाय. एक प्लॉट अमिताभ आणि जया यांच्या नावावर होता, तर दुसरा प्लॉट केवळ अमिताभ यांच्या नावावर होता. बच्चन कुटुंबीयांच्या जुहू भागात पाच मोठ्या प्रॉपर्टी आहेत. जलसा, प्रतीक्षा, जनक हे तीन बंगले आहेत, तर जलसाच्या मागचा बंगला देखील काही वर्षांपूर्वी बच्चन यांनी खरेदी केला होता. तस वत्स नावाचा बंगला हा दीर्घकालीन भाडेतत्वावर सिटीबँकला देण्यात आला आहे. मेगास्टार अमिताभ बच्चन यांनी आपल्या मुलीला दिवाळीच्या आधी 50 कोटींचा प्रतीक्षा बंगला भेट दिला. अमिताभ बच्चन यांची मुलगी श्वेता बच्चन नंदा फॅशन डिझाइनर आहे. अमिताभ बच्चन यांनी 8 नोव्हेंबर रोजी श्वेताला बंगला भेट दिला. हा बंगला 890.47 चौरस मीटर आणि 674 चौरस मीटरच्या दोन प्लॉटवर उभारण्यात आलाय. दोन्ही प्लॉट विठ्ठल नगर सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेडचा भाग असल्याचे कागदपत्रातून समजतेय. 8 नोव्हेंबरला भेटवस्तू डीडद्वारे श्वेता बच्चनला देण्यात आली. अमिताभ बच्चन यांनी 50.65 लाख रुपयांची स्टॅम्प ड्यूटीचा व्यवहार केला. अमिताभ बच्चन आणि जया बच्चन यांनी एकत्रित सह्या करत हा बंगला मुलीच्या नावावर केला.

# मार्शच्या कृत्यावर उर्वशी संतापली



भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया हा विश्वचषकाचा अंतिम सामना (WORLD CUP 2023) नुकताच पार पडला असून यात ऑस्ट्रेलियाने विश्वषकाच्या ट्रॉफीवर आपलं नाव कोरलं. त्यानंतर भारतीय क्रिकेटप्रेमी नाराज झाले. मात्र दुसरीकडे ऑस्ट्रेलियाचा खेळाडू मिचेल मार्शलच्या (MITCHELL MARSH) एका कृत्याने मात्र क्रिकेट फॅन्सने संताप व्यक्त केला. मिचेल मार्शलचा वर्ल्डकप ट्रॉफीवर पाय ठेवतानाचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. आता यासंदर्भात बॉलिवूड अभिनेत्री उर्वशी रौतेलाने (URVASHI RAUTELA) एक खास पोस्ट शेअर करत मिचेल मार्शनला सुनावलं आहे. "भावा, वर्ल्डकप ट्रॉफीचा थोडा तरी आदर कर", असं ती म्हणाली आहे. बॉलिवूड अभिनेत्री उर्वशी रौतेलाने आपल्या सौंदर्याने सर्वांना वेड लावलं आहे. आता तिने इंस्टा पोस्ट शेअर करत लिहिलं आहे,"मिचेल मार्शल भावा... वर्ल्डकप ट्रॉफीचा थोडा तरी मान ठेव...फक्त दिसण्यासाठी मिचेलने ट्रॉफीवर पाय ठेवला आहे". उर्वशीची ही पोस्ट सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

कूल

# एक दोन ती चार'चा धमाकेदार टीझर रिलीज

मराठी मनोरंजनसृष्टी पुन्हा बहरली आहे. वेगवेगळ्या दर्जाची नाटके (DRAMA), मालिका (SERIAL) आणि चित्रपट (MOVIES) प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. जगभरातील प्रेक्षकांना मराठी कलाकृती आवडत आहेत. पण कलाकाराचं वैयक्तिक आयुष्य कसं आहे, मालिका आणि सिने विश्वात काय घडामोडी घडत आहेत हे जाणून घेण्याची देखील प्रेक्षकांना उत्सुकता आहे. जाणून घ्या मराठी मनोरंजनसृष्टीसंबंधित बातम्या... मराठीसह हिंदी मनोरंजनसृष्टी गाजवणारे अभिनेते नाना पाटेकर (NANA PATEKAR) यांचा एक व्हिडीओ काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर व्हायरल झाला असून या व्हिडीओमध्ये ते एका व्यक्तीच्या कानाखाली वाजवताना दिसत होते. नानांचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर त्यांना प्रचंड ट्रोल करण्यात आलं. त्यानंतर त्यांनी माफीही मागितली. एकीकडे हा सिनेमाचा भाग असल्याचं म्हटलं गेलं तर दुसरीकडे सेल्फी घेण्यासाठी नानांजवळ गेलो असता त्यांनी कानाखाली वाजवल्याचा खुलासा चाहत्याने केला. आता याप्रकरणी माजी आएएस अधिकारी अभिषेक सिंहने (IAS ABHISHEK SINGH) व्हिडीओ शेअर करत नानांना धमकी दिली आहे. मराठी मनोरंजनसृष्टीसाठी 2023 हे वर्ष खूपच कमाल होतं. कोरोनानंतर प्रेक्षकांची पाऊले पुन्हा एकदा सिनेमागृहाकडे वळवण्याचं काम मराठी मनोरंजनसृष्टीने केलं आहे. अनेक मराठी सिनेमांनी (MARATHI MOVIES) बॉक्स ऑफिस गाजवलं. आता पुढच्या वर्षाची सुरुवातदेखील मनोरंजनात्मक होणार आहे. नुकताच 'एक दोन तीन चार' (EK DON TEEN CHAR) या मराठी सिनेमाचा टीझर रिलीज झाला आहे. हा टीझर सिनेरसिकांच्या पसंतीस उतरला असून ते आता सिनेमाची प्रतीक्षा करत आहेत. आभाळमाया', 'वादळवाट' ते 'जुळून येती रेशीमगाठी' अशा अनेक मालिकांनी छोटा पडदा चांगलाच गाजवला आहे. 'दामिनी' ही मालिका छोट्या पडद्यावर चांगलीच गाजली होती. या मालिकेत प्रतीक्षा लोणकर मुख्य भूमिकेत होती. अन्नायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या एका स्त्रीची गोष्ट या मालिकेत दाखवण्यात आली होती. या मालिकेचं टायटल ट्रॅकदेखील प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलं होतं. आपल्या विनोदाच्या अचूक टायमिंगने प्रेक्षकांना मनमुराद हसवणाऱ्या अभिनेता भाऊ कदम (BHAU KADAM) यांचा चाहता वर्ग मोठा आहे. त्यांच्या आगामी चित्रपटांची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत.

# माजी IAS अधिकाऱ्याने व्हिडीओ शेअर करत नाना पाटेकरांना दिली धमकी

मराठीसह हिंदी मनोरंजनसृष्टी गाजवणारे अभिनेते नाना पाटेकर (NANA PATEKAR) यांचा एक व्हिडीओ काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर व्हायरल झाला असून या व्हिडीओमध्ये ते एका व्यक्तीच्या कानाखाली वाजवताना दिसत होते. नानांचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर त्यांना प्रचंड ट्रोल करण्यात आलं. त्यानंतर त्यांनी माफीही मागितली. एकीकडे हा सिनेमाचा भाग असल्याचं म्हटलं गेलं तर दुसरीकडे सेल्फी घेण्यासाठी नानांजवळ गेलो असता त्यांनी कानाखाली वाजवल्याचा खुलासा चाहत्याने केला. आता याप्रकरणी माजी आएएस अधिकारी अभिषेक सिंहने व्हिडीओ शेअर करत नानांना धमकी दिली आहे.

नाना पाटेकरांच्या कानाखाली वाजवण्याच्या प्रकरणावर माजी आयएएस अधिकारी अभिषेकने आवाज उठवला आहे. अभिषेक म्हणाला,"पीडित तरुणाने आमच्यासोबत संपर्क साधल्यास कारवाई करू. या पीडित तरुणाने स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवायला हवी". अभिषेक सिंहच्या आता व्हायरल होणाऱ्या व्हिडीओमध्ये नाना पाटेकर आधी चाहत्याच्या कानाखाली





वाजवताना दिसत आहेत. नंतर अभिषेक याप्रकरणी आपलं मत मांडताना दिसत आहे. अभिषेक सिंह नाना पाटेकरांना धमकी देत म्हणाला,"उत्तर प्रदेशातील (UTTAR PRADESH) लोकांना उत्तर कसं द्यायचं हे चांगलच माहिती आहे. आम्ही परिपूर्ण आहोत. आम्ही उत्तम स्वागत करतो, आम्ही चांगल्याप्रकारे लोकांचा आदर करतो, त्याप्रमाणे आम्ही मारहाणदेखील उत्तमच करतो. त्यामुळे पुढच्यावेळी जेव्हा तुम्ही उत्तरप्रदेशात याल तेव्हा तुमच्यासोबत चांगला व्हवहार होणार नाही याची आम्ही विशेष काळजी घेऊ". नाना पाटेकर बनारसमध्ये त्यांच्या आगामी सिनेमाचं शूटिंग करत होतं. त्यावेळी एक चाहता सेल्फी घेण्यासाठी त्यांच्याजवळ गेला. दरम्यान नाना पाटेकरांनी त्या चाहत्याच्या कानाखाली वाजवली. नानांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला. त्यानंतर नानांनी एक व्हिडीओ शेअर करत (NANA PATEKAR ON VIRAL VIDEO) आपली बाजू मांडली. नाना म्हणाले,"मी चाहत्याच्या कानाखाली वाजवली नसून हे सिनेमाच्या शूटिंगदरम्यानचं एक दृश्य आहे".

# टी-20 वर्ल्ड कपसाठी संजूची निवड होणार?

## मला दुर्दैवी क्रिकेटर मानतात : संजू सॅमसन

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-20 मालिकेसाठी संजू सॅमसनची निवड न झाल्याने त्याचे चाहते खूपच निराश झाले आहेत. एवढेच नाहीतर राजकारण्यांनीही हा मुद्दा उचलून धरला आहे. यात काँग्रेस नेते आणि खासदार शशी थरूर आघाडीवर आहेत. त्यांनी टीम इंडियात संजूची निवड न झाल्याबद्दल संताप व्यक्त केला. रोहित, विराट, केएल राहुल आणि हार्दिक यांच्या अनुपस्थितीत टीम इंडियाचे कर्णधारपद सूर्यकुमार यादवकडे सोपवण्यात आले, पण संजू सॅमसनलाही संघात स्थान मिळाले नाही. यादरम्यान, संजूची प्रतिक्रिया समोर आली आहे.**



सॅमसन म्हणतो की, चाहते मला सर्वात दुर्दैवी क्रिकेटर मानतात, पण मी जिथेपर्यंत पोहोचलो आहे त्याने समाधानी आहे. खरंतर मी विचार केला नव्हता तेवढे यश मला मिळाले आहे. क्रिकेटच्या वर्तुळात संजू सॅमसनला भारतातील सर्वात दुर्दैवी क्रिकेटर संबोधले जाते. त्याने 2015 मध्ये झिम्बाब्वे विरुद्ध टीम इंडियासाठी पदार्पण केले. परंतु त्यानंतर त्याला पाच वर्षे संधी मिळाली नाही. त्यानंतर 2020 मध्ये श्रीलंकेविरुद्ध त्याने पुढचा सामना खेळला. 2015 मध्ये भारतीय संघासाठी पहिला सामना खेळणाऱ्या संजूला 9 वर्षांत केवळ 13 एकदिवसीय आणि 24 टी-20 सामने खेळण्याची संधी मिळाली आहे. देशांतर्गत क्रिकेटसोबतच आयपीएलमध्ये संजूने अनेकवेळा दमदार कामगिरी करून संघात स्थान मिळवले, पण कधी तो त्या संधीचे सोने करू शकला नाही तर कधी राखीव खेळाडू राहूनच घरी परतला. नुकत्याच सुरू झालेल्या भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया 5 सामन्यांच्या टी-20 मालिकेसाठी देखील त्याची निवड झाली नाही. एका यूट्यूब चॅनलसाठी संजू सॅमसनने मुलाखत दिली. यावेळी तो म्हणाला, ‘लोक मला सर्वात दुर्दैवी खेळाडू म्हणतात, पण मी आत्ता जिथवर पोहोचलो आहे, ते कित्येक पटीने जास्त आहे.’या मुलाखतीदरम्यान सॅमसनने (SANJU SAMSON) टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्माबद्दलही (ROHIT SHARMA) भाष्य केले. तो म्हणाला की,‘रोहित शर्मा हा उत्तम कर्णधार आहे. तो पहिला किंवा दुसरा व्यक्ती आहे जो माझ्याकडे आला आणि त्याने माझी विचारपूस केली. अरे संजू, कसा आहेस... तू आयपीएलमध्ये चांगली कामगिरी केलीस. मुंबई इंडियन्सविरुद्ध खूप षटकार मारलेस. तू खरोखरच चांगली फलंदाजी करतोस. तो स्पर्धेदरम्यान मला खूप सपोर्ट करतो.’संजू सॅमसनसाठी भारतीय संघाचे दरवाजे पूर्णपणे बंद झालेले नाहीत. टाईम्स ऑफ इंडियाच्या बातमीनुसार, मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी नुकतीच मुंबईत संजूशी भेट घेतली.

### सूर्यकुमारवर विश्वास दाखवला

» दोघांमध्ये चर्चा झाली. पण या बैठकीत काय घडले हे समोर आलेले नाही. मात्र, संजू हा निवड समितीच्या भविष्यातील योजनांचा एक भाग असल्याचे संकेत मिळत आहेत. संजू सॅमसन (SANJU SAMSON) हा आयपीएलमध्ये (IPL) राजस्थान रॉयल्सचे (RR) नेतृत्व करतो. त्याला कर्णधारपद भूषवण्याचा भरपूर अनुभव आहे. अशा प्रतिभावान खेळाडूकडे निवड समिती दुर्लक्ष का करते? असा प्रश्न चाहत्यांना पडतो. त्यामुळे सोशल मीडियावर संजूचे चाहते त्याला भारतातील सर्वात दुर्दैवी क्रिकेटर म्हणतात. संजू सॅमसनने (SANJU SAMSON) 2021 मध्ये टीम इंडियासाठी वनडे फॉरमॅटमध्ये पदार्पण केले. आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामन्यांमध्ये संजूचे रेकॉर्ड चांगले आहे. त्यामुळे वनडे विश्वचषक स्पर्धेपूर्वी टीम इंडियाच्या संघात त्याची निवड होणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. मात्र संघ व्यवस्थापनाने संजूपेक्षा वनडे रेकॉर्ड खराब असणा-या सूर्यकुमारवर विश्वास दाखवला.

# सूर्यकुमारने रोहित शर्माला टाकले मागे!

## कोहलीचा एक ‘विराट’ विक्रम तोडण्यासाठी एक पाऊल पुढे

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विशाखापट्टणम येथे ऑस्ट्रेलिया विरुद्ध खेळल्या गेलेल्या पहिल्या टी-20 सामन्यात टीम इंडियाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने स्फोटक खेळी केली. त्याने 42 चेंडूत 80 धावा करून टीम इंडियाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. तो प्लेअर ऑफ द मॅच ठरला. याचबरोबर सूर्याने टीम इंडियाचा नियमित कर्णधार रोहित शर्माचा एक विक्रम मोडीत काढला आणि कोहलीचा एक ‘विराट’ विक्रम तोडण्यासाठी एक पाऊल पुढे टाकले.**




सूर्यकुमारने प्रथमच टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यात भारताचे कर्णधारपद भूषवले. त्याच्या या मोहिमेची सुरुवात विजयाने झाली. कर्णधार या नात्याने तो कांगारू संघाविरुद्ध केवळ यशस्वी झाला नाही, तर पहिल्याच सामन्यात फलंदाज म्हणूनही चमकला. एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतील खराब कामगिरीला मागे टाकत त्याने 42 चेंडूत 4 षटकार आणि 9 चौकारांच्या मदतीने 80 धावांची दमदार खेळी केली. सूर्यकुमारच्या खेळीचा भारताला फायदा झाला. तर रिंकू सिंहने उत्कृष्ट फिनिशर म्हणून आपला दबदबा कायम ठेवला. त्याच्या नाबाद 22 धावांच्या झटपट खेळीने अखेरच्या क्षणी भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब झाला. सूर्यकुमार (SURYAKUMAR YADAV RECORD) त्याच्या दमदार खेळीसाठी ‘प्लेअर ऑफ द मॅच’ म्हणून निवडण्यात आले. सूर्याला टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये 13व्यांदा सामनावीराचा पुरस्कार मिळाला आहे. याचबरोबर त्याने रोहित शर्माचा विक्रम मोडला. रोहित 148 टी-20 सामन्यांमध्ये 12 वेळा सामनावीर म्हणून निवडला गेला आहे, तर सूर्यकुमारने 54 सामन्यांमध्ये ही कामगिरी केली आहे. या यादीत अव्वल क्रमांकावर भारताचा रन मशिन विराट कोहली आहे. त्याच्या नावावर 115 सामन्यांत 15 सामनावीराचे पुरस्कार आहेत. विराटला मागे टाकण्यासाठी सूर्याला आता तीन सामनावीर पुरस्कारांवर कब्जा करावा लागणार आहे. टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये कर्णधार म्हणून पदार्पण करताना हा पुरस्कार जिंकणारा सूर्यकुमार यादव हा दुसरा भारतीय आहे. यापूर्वी वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने ही कामगिरी केली होती. या वर्षी आयर्लंड दौऱ्यावर बुमराहला कर्णधार बनवण्यात आले होते जिथे त्याने उत्कृष्ट गोलंदाजी केली. तसेच कर्णधार म्हणून पदार्पणाच्या सामन्यात सर्वोत्तम अर्धशतकी खेळी करणारा सूर्या हा दुसरा भारतीय खेळाडू बनला आहे. यापूर्वी हा विक्रम केएल राहुलच्या नावावर होता ज्याने पहिल्यांदा टीम इंडियाचे नेतृत्व करत अफगाणिस्तानविरुद्ध 62 धावांची खेळी केली होती. सूर्यकुमारने (SURYAKUMAR YADAV RECORD) तिसऱ्या किंवा त्याखालील क्रमांकावर फलंदाजी करताना षटकारांचे शतक पूर्ण केले. ही कामगिरी करणारा तो एकूण तिसरा आणि भारतीयांमध्ये दुसरा खेळाडू ठरला आहे. सूर्यकुमारच्या आधी टीम इंडियाचा माजी कर्णधार विराट कोहलीने ही कामगिरी केली होती. सूर्याच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने टी-20 आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात मोठ्या धावांचा पाठलाग केला. सूर्याने 190.48 च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या. आतापर्यंत 54 टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये त्याने 46.85 च्या सरासरीने आणि 173.38 च्या स्ट्राईक रेटने 1921 धावा केल्या आहेत.

### सूर्यकुमारच्या खेळीचा भारताला फायदा

» तेव्हापासून या फॉरमॅटमध्ये त्याने खळबळ माजवली आहे. या फॉरमॅटमध्येही तो सध्या नंबर वन बॅट्समन आहे. एवढेच नाही तर प्रथम फलंदाजी करताना तसेच धावांचा पाठलाग करताना त्याचा फलंदाजीचे रेकॉर्ड उत्कृष्ट आहे.सूर्यकुमारने प्रथमच टी-20 आंतरराष्ट्रीय सामन्यात भारताचे कर्णधारपद भूषवले. विश्वचषक स्पर्धेतील खराब कामगिरीला मागे टाकत त्याने 42 चेंडूत 4 षटकार आणि 9 चौकारांच्या मदतीने 80 धावांची दमदार खेळी केली. सूर्यकुमारच्या खेळीचा भारताला फायदा झाला. तर रिंकू सिंहने उत्कृष्ट फिनिशर म्हणून आपला दबदबा कायम ठेवला.

# MahaENews

The fight for truth... the right to democracy!

www.mahaenews.com | SATURDAY, 25th NOVEMBER 2023 | Digital Edition | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# Students celebrated Children's day in fervor even during Diwali vacation

## Gayatri English School in Bhosari runs an exemplary initiative; Students enjoyed 'online' through various 'activities'

**Pimpri : Representative**

**Pimpri. Children's Day is a day of joy and excitement for students. However, this year, as the Diwali vacations were on; 'Children's Day' could not be celebrated in many schools. Gayatri English Medium School in Bhosari proved an exception. The school, which has already created a bond of affection with students and parents; planned and celebrated 'Online' Children's Day this year, inculcating affection towards students and parents.**




Every year Gayatri English Medium School of Swami Vivekananda Shikshan Prasarak Mandal (SVSPM), Bhosari celebrates Children's Day (November 14) with great zeal and fervor. This year, however Diwali vacations were on and so, students couldn't enjoy the same in school. School administration therefore planned a new way to celebrate it online. Students and parents also responded in a spontaneous way. Students made earthen lamps called 'Panati' in the school during 'Diwali Mela'. This encouraged them to bring 'Panatis', decorate them and gift to their relatives.

Students were encouraged to present various activities. Thus, this year's Children's Day also became memorable. Vice Principal Priya Newale and Shruti Joshi took the initiative for this celebration. Vrishali Ahire and her team of Pre-Primary Department tried to entertain students by making beautiful masks.

All the teachers and non-teaching staff of the school took the initiative for this work. Vinayak Bhongale, Founder-President of the organization, Kavita Bhongale, Managing Director and Trustee Sarita Vikhe-Patil appreciated this initiative.



"Children's Day" is a memorable day in the life of every student. It is celebrated in the country to mark the birth anniversary of Pandit Jawaharlal Nehru, the first Prime Minister of India. He was affectionately called 'Chacha Nehru' because of his fondness for children. The history of Children's Day should be known to the new generation. Children are the future of the country, hence it is necessary as well to create awareness about education and rights of children among them.

-Vinayak Bhongale, Founder President, SVSPM, Bhosari.

# NHAI's Double Tunnel Project at Khambatki Set To Transform Mumbai-Pune-Bengaluru Highway Commute

## Reduce the travel time from the Mumbai-Pune-Bengaluru highway to just ten minutes

**Pune :**

**In a significant development, the National Highways Authority of India (NHAI) has embarked on a transformative project to ease the commute between Pune, Satara, Mahabaleshwar, and Bengaluru. The project involves the construction of a double tunnel along the Khambatki Ghat route, aiming to reduce the travel time from the Mumbai-Pune-Bengaluru highway to just ten minutes by June 2024.**



hambataki Ghat, a crucial point for travellers heading to Satara, Mahabaleshwar, Kolhapur, Bengaluru, currently demands a journey of at least 45 minutes, with traffic congestion being a frequent challenge. Witnessing 55 thousand vehicles passing through daily, the existing two-lane tunnel experiences traffic jams, particularly given its one-way direction toward Satara.

Recognizing the need for an efficient solution, the NHAI initiated the double tunnel project at Khambataki Ghat along with an access route. Commencing on February 28, 2018, the 6.46 km project, costing Rs 926 crore, spans from the Satara to Khandala. Each of the three-lane tunnels boasts a width of 16.16 meters and a height of 9.31 meters, ensuring a comprehensive solution to enhance traffic flow.

With a commitment to safety, the project incorporates all necessary facilities to facilitate a secure journey for drivers and passengers. NHAI officials report that 60 per cent of the tunnel and access road project has been completed, signalling substantial progress toward the anticipated June 2024 deadline. Once finished, this initiative is poised to significantly reduce travel time and alleviate congestion on this critical highway route.